| दुखणे/लघवीच्या वेळी होणारी जळजळ /आग | लघवी होताना होणारी आग/जळजळ |
| | दुखणे (ओटीपोटात/पाठीत) |

**एच . आय . व्ही . चे निदान**

**कोणी एच . आय . व्ही . ची तपासणी करुन घ्यावी?**

- कोणतीही व्यक्ती ज्यांना तपासणी करायची आहे . (स्वत:हून)
- सर्व गर्भवती स्त्रिया किंवा गर्भवती रहाणार आहेत .
- ज्यांची वर्तणूक धोकादायक आहे (जसे की अनेक जोडीदार, लैंगिक/अंमली पदार्थाचे जबरदस्तीने सेवन इत्यादी)
- पुरूष ज्यांचे पुरूषांबरोबर लेंगिक संबंध आहेत . (एमएसएम)
- अशी व्यक्ती ज्यांचे अनेक लैंगिक (भागीदार) साथीदार आहेत किंवा ज्या पैशासाठी, आनंदासाठी किंवा अंमली पदार्थासाठी लैंगिक संबंध ठेवतात .
- ज्यांच्या वर्तणूकीतून धोका आहे असे लैंगिक जोडीदार असलेली व्यक्ती .
- अंमली पदार्थ शरीरात इंजेक्शनद्वारे घेणारे आणि त्यांचे जोडीदार .

- रक्त, अवयव आणि वीर्य देणारे व घेणारे .
- गुप्तरोग असणारी व्यक्ती .
- जर्मन कावीळ बी आणि जर्मन कावीळ सी (हिपॅटिटीस बी, सी )
- टि . बी . ची लागण झालेली व्यक्ती
- एड्ससारख्या आजाराने किंवा एड्स झालेली व्यक्ती
- नवजात (बाळ) जन्मता एच . आय . व्ही . ची लागण झालेले किंवा धोकादायक/जोखीम आई .

**एच . आय . व्ही . तपासणी**

एच . आय . व्ही . ची लागण झाल्याचे निदान करण्यासाठी दोन प्रकारच्या तपासण्या केल्या जातात त्या अशा आहेत –

- एच . आय . व्ही . (ऐंटीबॉडी) ची तपासणी
- एच . आय . व्ही . (ऐंटीजन) ची तपासणी

ॲन्टीबॉडी (Antibody)– शरीरातील रोग प्रतिवंधक/प्रतिकारक पद्धतीमधून तयार होणारा घटक जो शरीराला लागण न होण्यासाठी आणि बाहय घटकांबरोबर लढा देतो .

**एच . आय . व्ही . ॲन्टीबॉडीच्या तपासण्या अशाप्रकारे**

- सर्वसाधारणपणे उपयोग जास्त प्रमाणात निदान होण्यासाठी (वय > १८ महिने)
- आर्थिकदृष्ट्या
- शिघ्र
- कोणत्याही प्रयोगशाळेत सहजपणे होणाऱ्या

व्यक्ती ही एच . आय . व्ही . ची लागण झालेली आहे किंवा नाही हे घोषित करण्यापूर्वी या तीन तपासण्या कराव्या लागतात . काही केसेसमध्ये जर शंकादायक निदान असेल किंवा विंडो काळ असेल, तर त्या व्यक्तीला परत तीन महिन्यांनी तपासणीसाठी बोलवावे आणि एच . आय . व्ही होऊ नये यासाठी समुपदेशन करावे .

तपासण्या अशा आहेत :

- एच . आय . व्ही . ची रेपीड तपासणी
- एलायजा (Elisa)
- वेस्टर्न वोल्ट (टेस्ट) तपासणी (निदान नक्की करण्याची तपासणी )

**ऐंटीजन** (प्रतीद्रव्यजनक) (Antigen)– असा घटक जो रोगप्रतिकार पद्धतीला अँटीबॉडीज तयार करण्यासाठी प्रवृत्त करतो . (जसे की प्रोटीन जी ॲन्टीजीन्स विरूद्ध लढा देतात)

**एच . आय . व्ही . ॲन्टीजन (टेस्ट) तपासण्या –**

- एच . आय . व्ही . चे निदान ॲन्टीबॉडी पेक्षा लवकर होते .
- सर्वसाधारणपणे वापरले जाते
  - निदान : वय < १८ महिने
  - एच . आय . व्ही . च्या वाढीबाबतचा आढावा घेण्यासाठी .
  - ऐ . आर . व्ही . थेरपी (उपचारपद्धती) ला मिळणारा प्रतिसाद बघण्यासाठी .
- महाग
- यासाठी जी ही तपासणी करुन त्याचे विवरण करु शकतात असे तज्ञ लागतात .

ते असे :


- डी . एन . ए . पी . सी . आर (DNA PCR)
- पी२४ ॲन्टीजीन (P24 Antigen)

**रॅपीड तपासणी**

एच . आय . व्ही . ची परीक्षा ही अतिशय संवेदनशील, सोपी आणि सर्वसाधारण परीक्षा आहे . हयाच्या सुरूवातीच्या टप्प्यावर एच . आय . व्ही . ची लागण प्राथमिक आहे का हे पाहण्यासाठी उपयोग केला जातो .

ही अतिशय सोप्या पद्धतीने ए . एन . एम आपल्या उपकेंद्रावर/प्राथमिक आरोग्य केंद्रामधे करु शकतात .

हया तपासण्या नॅको च्या पहिल्या योजनेनुसार आधारित आहे, जर तपासणी नकारात्मक आली तर नमुना सुद्धा एच . आय . व्ही . ची लागण नसल्याचे मानले जाते . पण जर निदान सकारात्मक आला तर नमुना एच . आय . व्ही . ची लागण असल्याचे मानले जाते आणि रुग्ण (पेशंट) आय . सी . टी . सी . ला सल्ल्यासाठी तपासणी आणि खात्रीसाठी पाठविण्यात येते .




**एच . आय . व्ही . च्या सातत्याने होणाऱ्या तपासणी परीक्षेसाठी परिशिष्ठ 1 चा वापर करा**

**ॲन्टी रेट्रोवायरल उपचारपद्धती (ART)**

एच . आय . व्ही . ॲन्टीरेट्रोवायरल उपचारपद्धती एच . आय . व्ही . आणि एड्ससाठी मुख्य उपचार पद्धती आहे . हा आजार पूर्णपणे बरा होत नाही पण लोकांना बऱ्याच काळापर्यंत निरोगी ठेवण्यास मदत होते . एच . आय . व्ही . ची रक्तातील पातळी कमी करून शरीराला रोगाबरोबर लढा देण्याची क्षमता वाढवते .

उपचारपद्धती लहान व मोठे एच . आय . व्ही उपचारासाठी वापरता येते .

**सर्वसाधारणपणे सांगितली जाणारी औषधी रसायने –**

| | | | |
|---|---|---|---|
| **एआरटी** | – | ॲन्टी रेट्रोव्हायरल थेरपी | हया सर्व संज्ञा परस्पर बदलांबरोबर वापरल्या जातात |
| **एआरवीस्** | – | ॲन्टी रेट्रो व्हायरल्स | |
| **एचएआरटी** | – | हायली ॲक्टीव्ह ॲन्टी रेट्रोव्हायरल थेरपी | |

ॲन्टी रेट्रोव्हायरलचा इलाज दिर्घकाळ परिणाम देण्यासाठी एखादयाला एका वेळेला एकापेक्षा जास्त ॲन्टीरेट्रोव्हायरल औषधी रसायने घ्यावी लागतील . याला कॉम्बिनेशन थेरपी असे म्हणतात . **जसे हायली ॲक्टीव्ह ॲन्टीरेट्रोव्हायरल थेरपी (HAART)**

देशामध्ये अशी ए . आर . टी . विविध ए . आर . टी/लिंक ए . आर . टी . सेंटर मध्ये उपलब्ध आहेत . जेथे आय . सी . टी . सी . मधून पी . एल . एच . आय . व्ही . पाठविले जातात .

## अ) ॲन्टी रेट्रोव्हायरल थेरपीची उद्दिष्टे (ART)

- पी . एल . एच . आय . व्ही . असणाऱ्यांना दिर्घकाळ आणि चांगले आयुष्य मिळण्यासाठी मदत करणे
- एच . आय . व्ही . ची रक्तातील पातळी शक्य तेवढी कमी करणे .
- पी . एल . एच . आय . व्ही . ची सीडी ४ची पातळी आणि प्रतिकारशक्ती वाढविणे .
- एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे एच . आय . व्ही . चा फैलाव होण्याची शक्यता कमी करणे .
- इस्पितळामध्ये भरती होण्याची गरज कमी करणे .

## ब) ए . आर . टी . चे फायदे




- प्रासंगिक कारणाने चालू झालेले असलेल्या प्रार्दुभावाचा इलाज (ओआयस्)
- ओ . आय . एस . चा इलाज करून इस्पितळात भरती होणे कमी करणे .
- आयुष्य वाढविणे .
- आशादायी रहाणे
- आयुष्य चांगल्या पद्धतीने वाढविणे
- एच . आय . व्ही . चा फैलाव कमी करणे
- वयस्क आणि लहान मुले दोघांच्या फायदयाचे

## क) ए . आर . टी . च्या मर्यादा (Limitations)

ए . आर . टी . मुळे पी . एल . एच . आय . व्ही . च्या लोकांच्या तब्येतीत अमुलाग्र बदल वाढीस लागला आहे . तसेच आयुष्याच्या अपेक्षा उंचावल्या आहेत .

- ए . आर . टी . मुळे एड्स बरा होत नाही .
- एच . आय . व्ही . शरीरातून पूर्णपणे बाहेर काढला जात नाही
- जरी पी . एल . एच . आय . व्ही . हा निरोगी आणि नियमित औषधे घेत असला तरी तो एच . आय . व्ही . चा इतरांकडे फैलाव होऊ शकतो .
- ए . आर . टी . हे संपूर्ण आयुष्यभर घेता येते .

**सर्वसाधारण ए . आर . व्ही . औषधी रसायने**

झिडोव्हुडिन (AZT, ZDV) (Zidovudine)
लामिव्हुडिन (Lamivudine) (3TC)
स्टॅव्हुडिन (stavudine) (d4T)
इफॅव्हीरेंज (Efavirenz (EFZ))
नीवॅरेपीन (Nevirapine (NVP))

**एआरवी औषधी ३ रसायनांच्या मिश्रणाने दिले जावे .**

- हे मिश्रण म्हणजे एआरवी ची एक तुकडी /भाग म्हणून मानला जातो शिवाय रासायनिक औषधांचे मिश्रणही मानले जाते
- एआरवी चे १ किंवा २ औषधी उपाययोजना करणे हे चुकीचे आहे आणि त्यामुळे ओषधी प्रतिरोध होऊ शकतो .

**ए . आर . टी . ची सुरूवात**

अ) ए . आर . टी . ची सुरूवात करताना लक्षात घेण्याचे घटक

ए . आर . टी . घेताना अनेक घटक आहेत ज्याचा माणसांवर परिणाम होऊ शकतो आणि हे सर्व ए . आर . टी . सुरू करण्यापूर्वी काळजीपूर्वक पडताळून पाहणे गरजेचे आहे . त्यातील काही महत्त्वाचे घटक असे आहेत –

- सीडी ४ च्या पातळीवरुन पी . एल . एच . आय . व्ही . उपचारासाठी लायक आहेत का ते ठरविणे
- पी . एल . एच . आय . व्ही . ची सर्वसाधारण तब्येत आणि लागण झाल्याचा टप्पा कसा आहे
- ए . आर . टी . चे अनेक (दुष्परिणाम आहेत) बाहय परिणाम आहेत आणि योग्य कार्यप्रणालीची गरज आहे .
- पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांची ए . आर . टी . दिर्घकाळ घेण्याची मानसिक तयारी हवी आणि दुष्परिणामांशी लढण्याची तसेच ए . आर . टी . केंद्रावर नियमितपणे भेट देण्याची तयारी असावी लागते .

**ॲन्टीरेट्रोव्हायरल औषधे चालू करण्याची घाई नसावी**

**सर्वसाधारण ए . आर . टी . चे बाहयपरिणाम (दुषपरिणाम) असे आहेत :**

डोकेदुखी, मळमळ आणि उलटी येणे, त्वचेला ओरखडे येणे, हगवण, दमणे, (ॲनिमिया) इत्यादी .

**ए . एन . एम . ने पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांना खालील माहिती देणे .**

- ए . आर . टी . चे फायदे आणि मर्यादा
- ते नेहमी ३ रासायनिक औषधांच्या मिश्रणाने घ्यावे
- ए . आर . टी . चे डोस कधीही चुकवून चालत नाही . (महिन्यातून ३ डोसांपेक्षा जास्तीत जास्त नाही)
- जर ए . आर . टी . चा डोस चुकविला तर ते झालेली लागण काळापर्यंत मर्यादित ठेऊ शकत नाही .
- ए . आर . टी . कधीही पी . एल . एच . आय . व्ही . बरोबर कधीही भागीदारी करू नये
- ए . आर . टी . चे बाहय परिणाम होतात आणि ते तात्पुरते असतात .
- जर ते गंभीर असेल तर वैद्यकीय मदत घ्यावी .
- वैद्यकीय अधिकाऱ्याशी चर्चा केल्याशिवाय ए . आर . टी . थांबवू नये .

## महत्त्वाच्या टीपा

☛ एच . आय . व्ही . हा विषाणू रोगप्रतिकारक शक्तीचा नाश करतो .

☛ त्याच्या पुर्निर्माण प्रक्रियेसाठी सीडी ४ चा उपयोग करतात .

☛ एच . आय . व्ही . ची लागण झाल्यानंतर एड्स ही त्याची शेवटची पायरी आहे .

☛ एच . आय . व्ही . चा फैलाव हयाच्यामार्फत होतो .

- एच . आय . व्ही . झालेल्या व्यक्तीबरोबर असुरक्षित लैंगिक संबंध
- दुषित रक्त /रक्ताचे घटक यांचे देवाण घेवाण (ट्रान्स्फ्युझन)
- सुया भागीदारीत वापरणे
- गरोदरपणातून लागण झालेल्या आईकडून बाळाकडे, बाळाच्या जन्माच्या वेळी आणि स्तनपानातून

☛ विविध जैविक आणि सामाजिक घटकांमुळे महिलांना एच . आय . व्ही . /गुप्तरोग होण्याचा जास्तीत जास्त धोका आहे .

☛ गुप्तरोग झालेल्या व्यक्तीला लैंगिक संबंधातून गुप्तरोग नसणाऱ्या व्यक्तीपेक्षा एच . आय . व्ही . होण्याचा धोका जास्त असतो .

☛ एच . आय . व्ही . रोगाबद्दलची अचूक माहिती ए . एन . एम . ला मदत करते .

- एच . आय . व्ही . ची लागण झाली असण्याची शक्यता असलेल्या व्यक्तीला ओळखणे
- एच . आय . व्ही . च्या तपासणीसाठी एच . आय . व्ही . चा धोका असणाऱ्या व्यक्तींचा संदर्भपाठविणे
- आजारी व्यक्ती व तिच्या कुटुंबियांना माहिती देणे व समुपदेशन करणे

  १) सुरूवातीच्या काळातच तपासण्या आणि निदान करण्याचे महत्त्व

  २) आजारी व्यक्तीला अपेक्षित काय आहे

  ३) निरोगी जीवनपद्धती /जीवनशैली

  ४) डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे एआरटी घेण्याचे महत्त्व

  ५) एच . आय . व्ही . चा फैलाव रोखणे

# विभाग – ३
# कलंकी आणि दुजाभावाने वागविणे/(भिन्न दूर ठरविणे) कायदा आणि नैतिकता यांचे एच.आय.व्ही./एड्सवरचे मुद्दे

**परिशिष्ठ मुद्दे**

- ☛ एच.आय.व्ही./एड्सबद्दलचा ठपका आणि दुजाभावाची व्याख्या.
- ☛ एच.आय.व्ही.होण्यामागची कारणे आणि परिणाम – ठपका/या संबंधी चर्चा.
- ☛ एच.आय.व्ही.च्या संदर्भात काळजी घेतांना कलंक आणि दुजाभावाने याला संबोधित करण्यासाठी विविध मार्ग शोधणे.
- ☛ कचाटयात/पेचात पाडू शकणारे प्रसंग योग्य पद्धतीने हाताळणे
- ☛ पी.एल.एच.आय.व्ही.च्या संदर्भातील कायदयाचे आणि नैतिकतेचे मुद्दे समजून घेणे
- ☛ कलंक आणि दुजाभावाने वागविणे कमी होण्यासाठी ए.एन.एम.ची भूमिका ओळखणे

**प्रास्ताविक –**

एच.आय.व्ही.बद्दल पूर्वज्ञान/आगाऊ कल्पना, उपचार, काळजी आणि आधार यामधील कलंक किंवा दूजाभावाने वागविणे हे मार्गातील सर्वात मोठे अडथळे आहेत. हे सर्व स्तरावरील समाजात आढळतो. प्रत्येकामध्ये, कुटुंवात आणि समाजामध्ये हे सर्व कमी करण्यामध्ये ए.एन.एम.चा फार मोठा वाटा आहे.

**एच.आय.व्ही.च्या संदर्भातील कलंक आणि दुजाभाव सविस्तर सांगणे.**

कलंक म्हणजे नकारात्मकपणे वागणूक आणि विश्वास एखादया गोष्टीबद्दल किंवा व्यक्तीबद्दल असणे.

दुजाभावाने वागविणे म्हणजे एखादयाला किंवा एखादया गटाला तुटकपणे वागविणे किंवा असमान वर्तणूक किंवा पूर्वग्रहदुषितपणे वागविणे.

**दुजाभावाने वागविण्याची उदाहरणे –**

- एच.आय.व्ही.झालेल्या व्यक्तीला वैद्यकीय मदत नाकारणे/एकटे ठेवणे/आरोग्याची काळजी घेणाऱ्या कामगारांकडून नावे ठेवणे.
- एखादया व्यक्तीला म्हणजे त्याला/तिला एच.आय.व्ही.ची लागण झाली आहे म्हणून नोकरी गमवावी लागते.
- एच.आय.व्ही.ची लागण असलेल्या व्यक्तीला त्याला/तिला नोकरी मिळणं अवघड होते.
- एखादया स्त्रिने स्तनपान करण्यास नकार दिला तर तिला एच.आय.व्ही.ची लागण झाली आहे असे गृहित धरले जाते आणि तिची समाजाकडून अवहेलना केली जाते.
- समाजाकडून वाद (अवहेलना/वाळीत टाकणे) केले जाते.उदा.लागण झालेली स्त्री तिच्या सासू-सासऱ्यांकडून फेकली जाते.

**काळीमा लावणे आणि दुजाभावाने वागविण्यामागील कारणे काय असू शकतात?**

- लोकांबद्दल आणि त्यांच्या लैंगिक संबंधाबद्दलचे सर्वसाधारणपणे अंदाज
- वेकायदेशीर लैंगिक संबंध किंवा अंमली पदार्थ यांच्याशी निगडीत
- धर्माशी दुवा जोडणे आणि एड्स होणे ही देवानेच दिलेली शिक्षा असा विश्वास ठेवणे

- एच . आय . व्ही . च्या व्यवस्थेबद्दल कोणालाही शिक्षण नाही (वैद्यकिय सेवक)
- एच . आय . व्ही . /एड्स बद्दलच्या माहितीचा प्रार्दुभाव /उदासीनता (अगदी काल्पनिक भ्रम)
- अनोळखी गोष्टीबद्दलची भिती (विषाणू बद्दल संकुचीत भिती आणि मरणाची भिती)

**पी . एल . एच . आय . व्ही . व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबियांना कलंकीत आणि दुजाभावाने वागविण्याने काय परिणाम होतात?**

- बौद्धिक आणि मानसिक असंतुलन
- कलंक आणि दुजाभावाने वागविणे हे एखादया गंभीर आजाराप्रमाणे मानले जाते .
- जर पी . एल . एच . आय . व्ही . व्यक्तीने त्याच्या एच . आय . व्ही . बद्दलची स्थिती किंवा आजारपणातील उपचारांबद्दल वाच्यता केली तर त्यांना कलंकीत होऊन दुजाभावाने वागण्याला सामोरे जावे लागते .
  - जोडीदार आणि कुटुंबीय त्याग करतात, सोडून देतात .
  - आरोग्य – काळजी केंद्रातून, आधार आणि उपचार करण्यास नकार .
  - नोकरी मिळविणे कठीण असणे किंवा नोकरी जाणे
  - शाळेत किंवा महाविद्यालयात प्रवेश नाकारणे किंवा शाळा /महाविदयालयातून काढून टाकणे .
  - दांडगाई
  - काढून टाकणे, एकटेपणा आणि (मानसिक) औदासिन्य्
  - आरोग्य आणि इतर विमा कंपन्यांकडून नकार
  - स्थावर मालमत्तेवरील अधिकारास नकार
  - पालकांकडून मुलांना संसर्ग होणारा एच . आय . व्ही . चा संसर्ग प्रतिबंध करण्यात (PPTCT) हे गरोदर स्त्रियांना परावृत्त करतात .
    - प्रसुतीपूर्व सेवा आणि पी . पी . टी . सी . टी . ची सेवा घेणे .
    - तान्हा /नवजात बाळाच्या स्तनपानाच्या प्रक्रिया सुखरूप कार्यान्वयित करणे (आहार बदलत राहणे किंवा स्तनपान लवकर बंद करणे)
    - आई–बाळ या जोडीच्या तपासणी आणि उपचारांचा मागोवा

**कलंक लावणे आणि दुजाभाव दाखविणे यापासून आरोग्य काळजी प्रक्रियेत आपण कमी कसे करू शकतो?**

**कलंक (ठपका /काळीमा) ओळखणे आणि कमी करणे**

- एच . आय . व्ही . झालेल्या व्यक्तीला किंवा एच . आय . व्ही . आहे समजलेल्या व्यक्तीशी वागतांना आपण स्वत:चे कोणत्या वागणाणे / मानसिकता /विश्वासामुळे कलंक जाणवतो याकडे लक्ष दयायला हवे .
- आरोग्याच्या काळजीच्या परिस्थितीमध्ये
  - कलंक आणि दुजाभावाने वागविण्याच्या आव्हानाला जबाबदारीने स्विकारा .
  - अनादर किंवा अपमान दर्शविणारे न बोलता केलेले भाष्य टाळा . (उदा . चुकीचे चेहऱ्यावरील हावभाव)
- समाजामध्ये
  - एच . आय . व्ही . /एड्सबद्दल सर्वसामान्य लोकांना शिक्षण/माहिती दयायला हवी . त्यात प्रसार, प्रतिवंध आणि ए . आर . टी : पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांवर कलंकीत आणि दुजाभावाने वागविण्यामुळे होणारे परिणाम याचे समावेश .
  - पी . एल . एच . आय . व्ही . यांना सकारात्मक जगणे याबावत शिकविणे आणि आधार गटाबरोबर दुवा जोडणे, कलंक आणि दुजाभावाने वागविणे याच्या विरूद्ध उभे राहण्यासाठी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना प्रोत्साहन देणे .

- पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांना मानसिक आधार देणे .
- पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांना काळजी आणि आधार देणाऱ्या संस्थांमध्ये सामील करून घेणे .

**कायदेशीर आणि नैतिक बाबींबद्दलची प्रस्तावना –**

पी . एल . एच . आय . व्ही . च्या संदर्भातील कायदेशीर आणि नैतिक बाबींबद्दल जागृकता अशा व्यक्तिंची काळजी चांगल्या तऱ्हेने घेण्यासाठी आपणास मदत करू शकते .

**एच . आय . व्ही . च्या संबंधी संरक्षण, आदर आणि मानवी हक्क पूर्ण करण्याचे अधिकार**

- सर्व मुले, स्त्रिया आणि पुरुष त्यांच्या एच . आय . व्ही . चे प्रमाण लक्षात न घेता त्यांना माहिती आणि सेवा करून घेण्याचा हक्क आहे . ज्यामुळे ते त्यांची आणि कुटुंबियांचे आरोग्याचे संरक्षण (काळजी) करू शकतात .
- त्यांना एच . आय . व्ही . /एड्स समुपदेशन आणि त्यांच्या एच . आय . व्ही . कोणत्या दर्जाचा किंवा किती प्रमाणात आहे याची तपासणी करून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे .
- एच . आय . व्ही . च्या तपासण्या न करण्याबाबत किंवा त्याच्या निकालाबाबत न सांगण्याचा अधिकार त्यांना आहे .
- स्त्रियांना मुलं असण्याबद्दल/नवजात बालकांना स्तनपान करण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे . अर्थात संपूर्ण माहितीच्या आधारे आणि त्यांनी निवडलेल्या कृतीला पाठिंबा मिळण्याबाबत .

**एच . आय . व्हीच्या संबंधीच्या कायदेशीर बाबी –**

- १९९३ मधील औषधी रसायने आणि सौंदर्यप्रसाधनांच्या नियमानुसार एच . आय . व्ही . साठी रक्त आणि रक्तातील घटक यांची तपासणी देवाण–घेवाण करण्यापूर्वी करावी (आणि इतर संसर्गजन्य रोग)
- शासनाच्या नियमानुसार आर्टिकल (कलम) २१ प्रमाणे प्रत्येक माणसाला अधिकारानुसार, मुलभूत आरोग्यसेवा मिळण्याचा अधिकार आहे .
- १९९८ च्या जीव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाच्या नियमनानुसार, कोणतीही संस्था जी जीव वैद्यकीय कचरा निर्माण करते . त्या संस्थेने ती खबरदारी घेतली पाहिजे . ज्यामुळे असा कचरा कोणा व्यक्तीच्या आरोग्याला अथवा पर्यावरणाला उपद्रव न होता निवारण झाला पाहिजे अशी खबरदारी घेतली पाहिजे .
- (१९९४) अवयव दान कायदयानुसार खरोखर अवयव अदलाबदल करण्याआधी अवयव दात्याच्या योग्य त्या वैद्यकीय चाचण्या घेतल्या गेल्या पाहिजेत .
- (१९९५) कृत्रिम अवयव रोपण मानवी कायदयानुसार प्रक्रिया करण्यापूर्वी व्यक्ती एच . आय . व्हीसाठी तपासून घेणे आवश्यक आहे .
- (१९८६) ग्राहक संरक्षण कायदयानुसार वैद्यकीय गैर प्रकारापासून ग्राहक सुरक्षित असल्याची खात्री करणे .
- (वैद्यकीय व्यवसाय करणारे) डॉक्टर/औषध विक्रेता यांचा रोग्याचे निदान, उपचार, समुपदेशन करणे ही जवाबदारी आहे आणि कोणत्याही एच . आय . व्ही . ची लागण झालेल्या व्यक्तीला काळजी किंवा उपचारापासून वंचित ठेवता येत नाही .

**जर काही निष्काळजीपणा आढळला तर त्यांच्या व्यवसायावर बंदी येऊ शकते अशी कायदेशीर कारवाई केली जाते .**

- एच . आय . व्ही . ची लागण असलेले लोक (एच . आय . व्ही . पॉझिटिव्ह)
  - मालमत्तेचे वारसदार होण्याचा हक्क
  - मुलांचे पालकत्त्व स्विकारण्याचा अधिकार
  - नोकरीवरून काढून टाकू शकत नाही .

**नैतिक बाबी/मुल्ये –**

एच. आय. व्ही. ची लागण झालेल्या लोकांसाठी अशा काही महत्त्वाच्या नैतिक बाबी/मुल्ये आहेत ज्या एएनएमने मागोवा घेणे आवश्यक आहे. त्या अशा आहेत –

**एच. आय. व्ही. तपासणी आणि स्क्रिनिंग**

- सुरक्षित रक्त पुरवठयासाठी स्क्रिनिंगची परवानगी
- सिरो प्रावल्याचे स्क्रिनींगचा अभ्यास – हे एक निनावी दुवा नसलेले स्क्रिनींग आहे, ते फक्त परिणामात्मक माहिती गोळा करुन त्यामुळे रोगाचा प्रसार वाढला किंवा नियंत्रित झाला आहे ते कळते.
- समुपदेशन आणि माहितीपर संमती हे एच. आय. व्ही. च्या तपासणीसाठी जाणे आवश्यक नाही तरी नोकरीसाठी ती पूर्व अट असू नये किंवा वैद्यकीय तपासणीची चौकशी करू नये.
- भारतामधे सर्व आई होणाऱ्यांना बाळाच्या जन्मापूर्वी एच. आय. व्ही. ची तपासणी करून घेण्यासाठी समुपदेशन मिळावे. ती तपासणी त्यांनी स्वत:हून माहितीपर संमती दिल्यावर व्हावी.
- एच. आय. व्ही. च्या तपासणीचा निकाल काटेकोरपणे (काळजीपूर्वक) गुप्त ठेवले गेले पाहिजेत.
- जर एखादी व्यक्ती खाली दिलेल्या बाबी (अटी) प्रमाणे असेल तर प्राथमिक समुपदेशन उपलब्ध करून दिले पाहिजे.
  - एस टी आय
  - टि. बी.
  - र्कोनिक डायरिया (दिर्घकाळ होणारी हगवण)
  - वजन कमी होणे (वेटलॉस)
  - दिर्घकाळ येणार ताप (र्कोनिक फिव्हर)
  - दिर्घकाळ असणारा कफ (र्कोनिक कफ)
  - हरपेस झोस्टर
  - ओरल कॅनडिडायसिस
  - वारंवर तोंडात (ओरल) अल्सर आणि
  - लसीकाग्रंथीची सूज (लिम्फॅडिनोपॅथी)
  - गर्भवती महिला (प्रेग्नंट वुमेन)

**एकांत आणि गुप्तता**

- आरोग्य दक्षता घेणारी यंत्रणा (ए. एन. एमस्/स्टाफ नर्सेस) (कर्मचारी पर्यवेक्षिका)/डॉक्टर्स/(प्रयोगशाळेतील तंत्रज्ञ) (लॅबोरेटरी टेक्निशियन/इत्यादी) यांनी आजारी व्यक्तीची गुप्ततावद्दल संरक्षण दिले पाहिजे. एच. आय. व्ही. च्या निकालावावतीतही गुप्तता ठेवावी.
- माहिती न देणे (कोणत्याही प्रकारचा दुवा नसलेली निनावी माहिती एका माणसाची दुसऱ्या माणसास न देणे)
- आरोग्याची काळजी घेणाऱ्या उपचार संघाला एच. आय. व्ही. ची स्थिती जाणणे आवश्यक आहे. पी. एल. एच. आय. व्ही. ने कोणत्या आरोग्य काळजी पुरवठा करणाऱ्यांना दाखविणे आणि त्यांचे हे करण्यामागील फायदे हे सांगणे. हे सर्व पी. एल एच. आय. व्ही. च्या मान्यतेप्रमाणे करावे (गुप्तता मिळून घेणे)
- पी. एल. एच. आय. व्ही/आय. डी. युस्. यांना लैंगिक किंवा जोडीदारासमवेत सुयांची विभागून वापरणे/जोडीदार/कुटुंब/कोणतीही महत्त्वाची व्यक्ती जी पी. एल. एच. आय. व्ही ने ओळखही आहे अशांना जोडीदारच्या तपासणीची सुविधा आणि घरगुती काळजी याबाबत समुपदेशन करावे, जर पी. एल. एच. आय. व्ही. ही परत परत समोपदेशानंतर जर आपल्याला एच. आय. व्ही. झाला आहे हे जर आपल्या लैंगिक जोडीदार/नवरा किंवा बायको यांना सांगत नसेल तर ए. एन. एम. ने त्याला त्याच्या/तीच्या पर्यवेक्षकाकडे त्वरीत पाठवावेत.

- एच . आय . व्ही . बद्दलची स्थितीची जाणकारी व्यक्तिच्या कोणत्याही वैद्यकीय दाखल्यावर नसावी .
- सरकारी लिहून दिलेल्या मसुदयाप्रमाणे आरोग्य काळजीच्या सुविधांची माहितीमध्ये आजाराची स्थिती आरोग्य अधिकाऱ्याकडे कायद्यानुसार असणे आवश्यक असते . (आज्ञेप्रमाणे)

**एच . आय . व्ही . आणि गरोदरपणा**

- एच . आय . व्ही . पॉझिटिव्ह महिला आणि जोडपी यांना गर्भारपणा आणि मुले याची पूर्णपणे निवड करण्याचा निर्णय घेऊ शकतात .
- जेव्हा जोडप्याने मुलं होण्याचा निर्णय घेतला असेल तेव्हा लैंगिक संबंधामध्ये एच . आय . व्ही . चे विविध प्रकाराची लागण होण्याची शक्यता खूप असते त्याबाबत सल्ला दिला पाहिजे .
- जोडप्यांनी पालकांकडून मुलांकडे एच . आय . व्ही . चा फैलाव रोखण्याबाबतचे समुपदेशन घेतले पाहिजे .
- खालील मुद्दयांवरील अभ्यास माहिती .
  - बाळाला एच . आय . व्ही . चा फैलाव पसरण्याचा धोका
  - पी . पी . टी . सी . टी . च्या कार्यक्रमानुसार फैलाव पसरण्याचा धोका कमी करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या योजना
  - दत्तक घेण्याच्या शक्यता
  - स्वत :चे मुल असण्याचे महत्त्व आणि परिणाम
  - कुटुंब नियोजनाचे बरेच मार्ग, मुख्यत्त्वेकरून लैंगिक संबंध सुरक्षितपणे केले जावे . जसे पुन्हा संसर्ग एच . आय . व्ही . सोबत होऊ नये म्हणून कंडोमचा वापर

**पी . एल . एच . आय . व्ही . च्या जबाबदाऱ्या**

पी . एल . एच . आय . व्ही . ला त्याच्या /तिच्या जबाबदाऱ्यांविषयी मार्गदर्शन

- मनुष्याचे आयुष्य जतन करणे
- इतरांना कोणताही धोकादायक आजाराची लागण जाणीवपूर्वक होऊ देऊ नये उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे तुरूंगात टाकण्यापर्यंतची शिक्षा होऊ शकते जी दोन वर्षापेक्षा जास्त किंवा दंड किंवा दोन्ही
- त्यांच्या लैंगिक जोडीदाराला त्याच्या एच . आय . व्ही . बाबतची स्थिती माहिती करून देणे .
- कुटुंब आणि समाजात यांच्यासाठी समक्ष असल्यास हातभार लावण्यास पाऊले उचलणे .

## मुख्य संदेश

☛ कलंकीत करणे आणि दुजाभावाने वागविणे हे खालील प्रकारे स्पष्ट होते .

- लोकांना वेगळेपणाने वागविणे .
- व्यक्तिला एच . आय . व्ही . पॉझिटिव्ह म्हणून नावे ठेवणे /संबोधणे .
- ती व्यक्ती एच . आय . व्ही . सीरोपॉझिटिव्ह आहे हे दर्शविण्यासाठी त्याच्या विछान्यावर स्टिकर लावणे .

☛ कलंक आणि दुजाभावामुळे ना उमेद करते .

- एच . आय . व्ही . च्या तपासणीसाठी लोकांनी पुढे येणे .
- लोक जे त्यांची एच . आय . व्ही . स्थिती त्यांच्या जोडीदारापुढे खुलासा करत नाहीत त्यामुळे एच . आय . व्ही . चा फैलाव होतो .
- पी . एल . एच . आय . व्ही . उपलब्ध योजनांमधून उपचार घेतात जसे ओआयएस /एस टी आय एस /आर टी आय एस /ए . आर . टी .
- पी . एल . एच . आय . व्ही . लोकांची काळजी .

☛ ए . एन . एम . आरोग्य काळजीच्या भेटीतून कलंकीतपणा /खूणा /ठपका कमी करू शकते

- आरोग्य चाचणीमध्ये स्टाफ /डॉक्टर्सकडून खूणा /कलंकीतपणा ओळख कमी करण्याचा प्रयत्न आणि जेवढे शक्य आहे तेवढे कमी करणे .
- पी . एल . एच . आय . व्ही . च्या अधिकाराबद्दल /वर बोलणे .
- एच . आय . व्ही . होण्याच्या शक्यता त्याचा फैलाव आणि प्रतिबंध यांची इतर आरोग्याची काळजी घेणाऱ्या इतर सहकाऱ्यांना शिक्षण देणे . (आशा वर्कर , वाहय कामगार)
- लागण कमी होण्याच्या बाबींबद्दल सर्व आरोग्याची काळजी घेणाऱ्यांना शिक्षण .
- जनतेला एच . आय . व्ही . , त्याच्या शक्यता, फैलाव प्रतिबंध आणि नियोजन याबाबत माहिती देणे .
- पी . एल . एच . आय . व्ही . ला गुप्तता राखण्याबाबत खात्री बाळगण्याच्या बाबी

☛ पी . एल . एच . आय . व्ही . चे मुलभूत हक्क आदराने वजावले जावे

- समुपदेशन उपलब्ध करून आणि एच . आय . व्ही . च्या तपासणीसंबंधीची माहिती उपलब्ध करणे .
- रोगाची गुप्तता ठेवणे .
- एच . आय . व्ही . च्या स्थितीबद्दल जोडीदार /कुटुंब यांना सांगण्यासाठी उदयुक्त करणे .
- जोडप्यांना पालकांकडून मुलांपर्यंत फैलाव रोखण्यासाठी समुपदेशन
- काळजी आणि उपचार चांगल्याप्रकारे उपलब्ध करणे
- एच . आय . व्ही . पॉझिटिव्ह व्यक्तीला इतरांबरोबर त्याच दर्जानी राहण्याचा अधिकार आहे .
- पी . एल . एच . आय . व्ही . च्या संदर्भात ए . एन . एम . ने योग्य भूमिका वजावून योग्य तो पाठिंबा देणारा गट /विन सरकारी सामाजिक संस्था (NGO) यांना रुग्णांचा संदर्भ देऊन त्यांचे कायदेशीर व नैतिक समस्या सोडविणे .

# विभाग – ४
# एच . आय . व्ही . /एड्‌समधे काळजी घेण्यासाठी समुपदेशन

**युनिटचे मुद्दे –**

- ☛ समुपदेशनाचे महत्त्वाचे घटक उलगडून सांगणे
- ☛ एच . आय . व्ही . ची लागण या संबंधीत विविध विभागामध्ये समुपदेशनाची सविस्तर माहिती
- ☛ एच . आय . व्ही . च्या वादामध्ये समुपदेशनाचे महत्त्व सविस्तर सांगणे
- ☛ एच . आय . व्ही . च्या विविध प्रकारांच्या समुपदेशनासंबंधी सविस्तर चर्चा
- ☛ बनावट केसेस आणि नाटक यांच्या माध्यमातून समुपदेशन सराईतपणा शिकणे .
- ☛ पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांना आणि लोक यांना एच . आय . व्ही . ची . लागण होण्यामागील धोके या समुपदेशनाच्या वेळी ए . एन . एम . ची भुमिका आणि जबाबदाऱ्या सांगणे .

**१ . एच . आय . व्ही . आणि समुपदेशन**

एच . आय . व्ही . कार्यक्रमाअंतर्गत पी . एल . एच . आय . व्ही . आणि त्यांच्या कुटुंबियांना समुपदेशन देणे ही सर्वात महत्त्वाची अशी एक योजना आहे .

प्रयत्नात कसूर न करता एएनएम ला महत्त्वाची भूमिका बजावयाची आहे ज्यामध्ये लागण झालेले लोक तसेच धोक्याच्या स्थितीमध्ये असणारे लोक यांना एच . आय . व्ही . पासून वाचविणे आणि त्यांना योग्य पद्धतीने समुपदेशन करून मार्गदर्शन देणे .

**२ . समुपदेशन म्हणजे काय?**

समुपदेशन म्हणजे व्यक्ती (पेशंट) आणि काळजीवाहू यंत्रणा यांच्यामधील संवाद ज्याचा उद्देश त्याला/तिला तणावाला झुंज देणे आणि स्वत:चा निर्णय घेण्यासाठी सक्षम करणे . उदा . एच . आय . व्ही . संबंधीचे निर्णय – एच . आय . व्ही . ची तपासणी करणे, एच . आय . व्ही . ची पॉझिटिव्ह निकालाबाबत (सकारात्मक निकालाबाबत) कुटुंबियांस सांगणे, मुले असण्याबाबत इत्यादी . या पद्धतीत पेशंट (क्लायंट) च्या अडचणी जाणून घेणे, समजावून घेणे आणि त्या अडचणीतून मार्ग काढणे म्हणजेच सकारात्मक आयुष्य जगता येण्यासाठी बदल घडविणे .

**ए . एन . एम . एच . आय . व्ही . च्या संबंधी खालील प्रकारचे समुपदेशन करु शकतात .**

| | |
|---|---|
| **वैद्यकीय विभाग**<br>एच . आय . व्ही . /एड्स ची प्राथमिक माहिती, जाणकारी<br>एच . आय . व्ही . लागणाचा फैलाव आणि प्रतिबंध<br>एच . आय . व्ही . लागण संबंधी रोगाचे लक्षण,<br>एच . आय . व्ही . लागण आणि गरोदरपणा<br>ए . आर . टी . च्या उपचाराला सातत्याने घेणे .<br>सकारात्मक जगणे | **नातेसंबंध**<br>लैंगिक<br>कुटुंब आणि मित्रपरिवार<br>इतरांना सुरक्षित ठेवणे<br>एच . आय . व्ही . लागणापासून |
| **वैयक्तिक**<br>भिती, काळजी (अस्वस्थता), उदासीनता<br>एकटेपण आणि नाकारले जाणे | **प्रायोगिक मुद्दे**<br>संदर्भ, निर्देश आणि त्याचे जाळे |

विविध प्रकारची समुपदेशन त्याचे ठराविक गट ( टार्गेट गुप ) आणि मुख्य समुपदेशनाचे उद्दिष्ट

| **समुपदेशन ठिकाण** | | **ठराविक गट (टार्गेट गुप)** | **मुख्य समुपदेशनाचे उद्दिष्ट** |
|---|---|---|---|
| आय सी टी सी (ऐच्छिक ) | पूर्व परीक्षा | सर्वसाधारण जनसंख्या ऐच्छिक आणि संदर्भ | • एच . आय . व्ही . तपासणीचा निर्णय<br>• धोका कमी करणे |
| | पोस्ट टेस्ट निगेटिव्ह तपासणीनंतर नकारात्मक | एच . आय . व्ही . नसलेली व्यक्ती | • धोका कमी करणे आणि प्रतिबंध<br>• जोडीदाराची तपासणी |
| | तपासणीनंतर सकारात्मक | एच . आय . व्ही . असलेली व्यक्ती | • मानसिक आधार<br>• धोका कमी करणे<br>• सांगणे आणि जोडीदाराची तपासणी<br>• सकारात्मक प्रतिबंध<br>• काळजीच्यादृष्टीने आधार आणि उपचार |
| पी . आय . सी . टी (प्राथमिक समुपदेशन आणि तपासणी ) उदा . गर्भवती महिला | पूर्व तपासणी | व्यक्ती जिला एच . आय . व्ही . ची लागण असल्याची लक्षण/गुप्तरोग/टीबी गर्भवती महिला (एएनसी ला येणारा महिला) आधीपासून न सांगितलेल्या लेबररूमच्या अत्यावश्यक केसेस) | • एच . आय . व्ही . लागण झाल्याबद्दलची माहिती आणि तपासणी<br>• एच . आय . व्ही . तपासणीबाबत निर्णय<br>• आहार स्वच्छता याबद्दल शिक्षण .<br>• इस्पीतळात प्रसूतीचे महत्व<br>• धोका कमी करणे<br>• नकारात्मक निर्णय (पर्याय) |
| | (Post test negative) नंतरच्या नकारात्मक तपासण्या | एच . आय . व्ही . नसलेल्या माता | • प्रतिबंध<br>• सुरक्षित मातृत्त्व<br>• नियमित पुन्हा भेट देणे |
| | नंतरच्या सकारात्मक तपासाण्या | एच . आय . व्ही . असलेल्या माता | • मानसिक आधार<br>• सुरक्षित मातृत्त्व<br>• निव्हायरपाईन प्रोफाईलॅक्सिस<br>• इस्पीतळ प्रसूतीचे पर्याय<br>• बाळाना पाजण्याची सवय<br>• काळजी आणि उपचारासाठी संदर्भ<br>• नियमित तपासणीसाठी येणे |
| ए . आर . टी . | | पीएलएचआयव्ही . चे ए . आर . टी . घेतात | • उपचाराची तयारी<br>• उपचार नियमीत घेणे<br>• उपचार आधार |

## प्राथमिक समुपदेशनाची तरतूद करणारा (नकार) (opt - out)

पेशंटला (क्लायंट) आरोग्य काळजी केंद्राकडून आय . सी . टी . सी . कडे पाठविण्यात येते जिथे त्यांना एच . आय . व्ही . तपासणी बद्दलची माहिती आणि त्याचे फायदे याबद्दलची माहिती देण्यात येते .

वैयक्तिक समुपदेशक एच . आय . व्ही . ची नियमित तपासणी करण्यास भाग पाडणे आणि क्लायंट (पेशंट) एच . आय . व्ही . ची तपासणी करावी का नाही? असे सांगतात . पेशंटला तपासणी स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क आहे आणि जर नकार दिला तर समुपदेशनातून बाहेर पर्याय आहे . (opt out)

पेशंट (क्लायंट) तयार झाला, तर ती/तो समुपदेशनानंतर तपासण्या होतात .

**समुपदेशनासाठी क्लायंकचा पुढाकार (होकार) (opt in)**

क्लायंट जे आयसीटीसी मधे स्वत:हून भेट देतात आणि तपासणी करू इच्छितात त्यांना ते एच आय व्ही तपासणीसाठी समुपदेशन केले जाते आणि ते (होकार) opt – in साठी तयार होतात.

**३. क्लायंट (पेशंट) चे शिक्षण हे समुपदेशनापेक्षा वेगळे कसे आहे?**

| पेशंटचे शिक्षण | समुपदेशन |
|---|---|
| तब्येतीविषयीची माहिती जाणून घेण्याचा | क्लायंटच्या शिक्षणाचा समावेश |
| पुढाकार रोग आणि उपचार याबद्दलची महत्त्वाची माहिती देणे | पी.एल.एच.आय.व्ही.ला मदत होते जसे भावना ओळखून धोकादायक वर्तणूक, बदलण्याची तयारी इ. |
| स्वत:ची काळजी घेण्याचा आत्मविश्वास | पी.एल.एच.आय.व्ही.ला आपल्या योजना आखण्यास मदत |
| | स्वच्छ विचार आणि निर्णायक क्षमता |

**४. परिणामकारक (चांगले) समुपदेशक कसे बनाल?**

परिणामकारक समुपदेशक असण्यासाठी आपल्याला परिणामकारक संवाद साधण्याची गरज आहे. जसे एच.आय.व्ही.लागण असलेल्यांवर अनेक गुंतागुंती असू शकतात. जसे शारिरीक, भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक अशा परिस्थितीत पाठींबा असणाऱ्या वातावरणात संभाषणाची गरज असते.

**परिणामकारक संभाषणाचे मुद्दे**

**निरोप**

- सकारात्मक आणि केंद्रस्थानी (फोकस)
- ऐकणाऱ्याला समाधानकारक वाटेल असे करा.
- समुपदेशनानंतरचा प्रतिसाद घेणे.
- महत्त्वाच्या मुद्दयांवर ठाम मत
- सकारात्मक वाक्यरचना
- योग्यता ओळखणे आणि सकारात्मक वर्तणूकास उत्तेजन.

**ऐकणे/शाब्दिक संभाषण नसणे**

- डोळयांच्या संपर्कात आणि हास्य जपणे.
- व्यक्तीकडे वाकून "होय" "हुंकार" आणि (ओके) "बरं" म्हणा
- गरज असेल तेव्हा व्यक्तीला स्पर्श करण्यास कचरू/काचाकूच करू नये.

**आवाज**

- मृदू/हळूवार आवाज वापरा जो त्याला/तिला स्वत:च्या प्रश्नांबद्दल बोलण्यास प्रवृत्त करेल.
- स्तुती करा आणि अधिक प्रवृत्त करा.

**प्रश्न विचारण्याचे तंत्र**

- अशाप्रकारे विचारा ज्यामुळे क्लायंट स्वत:च्या समस्यांवर माहिती सांगण्यास प्रवृत्त झाला पाहिजे .
- लगेच बोलण्यापेक्षा उत्तर देण्याआधी थोडे थांबले पाहिजे .
- समजले नसेल तर प्रश्न पुन्हा विचारणे

सकारात्मक निरोप संभाषणांतर्गत पी . एल . एच . आय . व्ही . बरोबर असणे, जो नकारात्मक निरोपांपेक्षा जास्त परिणामकारक असतो . निरोप जात असताना, कायम चौकटीबद्ध ठेवा ज्यामुळे ते नकारात्मक होण्याऐवजी होकारात्मक होईल .

| **सकारात्मक निरोप** | **नकारात्मक निरोप** |
|---|---|
| कंडोमच्या वापरामुळे गुप्तरोगापासून मुक्तता मिळू शकते . | कंडोमचा वापर न करणे हे तुम्हाला गुप्तरोग होण्याच्या धोक्यात टाकू शकते . |
| सावध काळजीपूर्वक लैंगिक संवंध तुम्हाला तसेच इतरांना बचाव करू शकतो . | जर तुम्ही सावधानता न बाळगता लैंगिक संवंध ठेवले तर तुम्हाला गुप्तरोग होऊ शकतो आणि तुम्ही एच . आय . व्ही . चा फैलाव दुसऱ्यांना करू शकता . |
| तुमची ए . आर . टी . जसे प्रिस्क्राईब (लिहून) केली आहे त्याप्रमाणे रोज घेणे जी तुम्हाला औषधप्रतिकार होण्यापासून बचाव करेल आणि तुम्हाला जास्त काळ सशक्त ठेवेल . | जर तुम्ही ए . आर . टी . लिहून दिल्याप्रमाणे घेतले नाही तर तुम्ही एच . आय . व्ही . ला प्रतिकार करू शकणार नाही आणि औषधोपचार तुमच्यावर काम करणार नाही . |

**इतर लक्षात ठेवण्याच्या महत्त्वाच्या बाबी –**

- खात्री करून घ्या, रोगी माहितीसाठी आणि समुपदेशनासाठी तयार आहे .
- रोग्यांच्या सोयीप्रमाणे वेळापत्रक
- गुप्तता आणि आरामशीर व्हायची खात्री
- रोग्यांच्या गरजा ओळखून त्यांना संबोधित करणे .
- रोग्यांच्या सोयीनुसार विषय निवडून चर्चा करणे . जसे लैंगिक इतिहासापेक्षा त्यांच्या कामाबद्दल चर्चा
- सकारात्मक वर्तणूकीसाठी आधार देणे .
- धोकादायक वर्तणूक शोधण्यास मदत करणे ज्यामुळे एच . आय . व्ही . चा फैलाव /परत लागण होण्याच्या शक्यता आणि कारणे ज्यामुळे रुग्ण आपली नकारात्मक वर्तणूक बदलू शकत नाही .
- सकारात्मक वर्तणूकीचा बदल घडवून आणण्यासाठी मार्गाची जुळवणी करणे .
- वर्तणूकीतील बदलातील प्रगती करण्यामध्ये मदत /आधार देणे .

एच . आय . व्ही . च्या काळजीमध्ये समुपदेशनाची मदत खालीलप्रमाणे होते .

